व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांचे कार्यालय
10/2, स्टारकी टाऊन, मंगलवारी बाजार, सदर, नागपूर-440001
दुरध्वनी क्र. 0712-2978844
E-mail ID: mahaecotourism@mahaforest.gov.in

ई-मेल
परिपत्रक

क्रमांक:- कक्ष-2/(यो.)/18-19/मार्गदर्शक सूचना /421
नागपूर-440001 दिनांक 28/06/2018

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व नागपूर / पश्चिम मुंबई
मुख्य वनसंरक्षक (प्रा) (सर्व) मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक व्या.प्र. (सर्व)
मुख्य वनसंरक्षक तथ क्षेत्र संचालक सं.गा.रा.ऊ. बोरीवली
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक पेंच / नवेगाव-नागझीरा व्या.प्र. स्थित गोंदिया
वनसंरक्षक (वन्यजीव) पुणे / नाशिक. उपवनसंरक्षक (वजी) ठाणे.

विषय :- राज्य निसर्ग पर्यटन योजना राबविणे तसेच चालु / नविन बाब प्रस्ताव सादर करणे बाबत मार्गदर्शक सूचना.

या कार्यालयास प्राप्त होत असलेल्या निसर्ग पर्यटन कामाचे आराखडे तसेच चालु / नविन बाब प्रस्तावाचे अवलोकन केले असता असे आढळून आले आहे की, त्यात निसर्ग पर्यटन योजनेत समाविष्ट होणा-या कामा व्यतिरिक्तची कामे समाविष्ट करुन प्रस्ताव सादर करण्यात येतात. पर्यायाने अशी निसर्ग पर्यटनाशी सुसंगत नसलेली कामे वगळून शासनास प्रस्ताव सादर करावे लागतात, ही बाब उचित नाही. त्या अनुषंगाने या कार्यालयातर्फे खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात येत आहे.

**1. निसर्ग पर्यटन योजनेचे उद्देश खालील प्रमाणे आहेत :-**

i. राज्याचे निसर्ग पर्यटन धोरणाप्रमाणे निसर्ग पर्यटन कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

ii. निसर्ग संवर्धन व संरक्षण करणे.

iii. निसर्ग पर्यटन कार्यक्रमाची स्थानीक लोकांच्या उपजिवीकेशी सांगड घालणे व त्यांना रोजगार मिळवून देणे.

iv. पर्यटकांना किमान आवश्यक सुविधा देणे.

v. निसर्ग शिक्षण, माहिती, प्रचार व प्रसार माध्यमातुन प्रामुख्याने विद्यार्थी व युवकांमध्ये जनजागृती निर्माण करणे.

vi. निसर्ग पर्यटनास चालना देण्यासाठी सर्व भागीदारांमध्ये परस्पर हित वाहक संबंधास (Symbiotic) प्रोत्साहन देणे व क्षमता बांधणी करणे.

vii. पर्यटन क्षमता (Tourism Potential) पुरेशा असलेल्या स्थळांची निवड करुन त्याचा विकास करणे व स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समिती / पर्यावरण विकास समिती व्दारा स्वयंचलीत करणे. (Self Sustainable)

**2. निसर्ग पर्यटन योजनेत समाविष्ट होणारी कामे.**

i. निसर्ग पर्यटन योजनेमध्ये प्रमुखत: प्रादेशिक, वन्यजीव, वनविकास महामंडळ, संयुक्त वन व्यवस्थापन समिती तसेच ग्रामपरिस्थितीकीय विकास समिती यांचे मार्फत त्यांचे कार्यक्षेत्रातील वनक्षेत्रात घ्यावयाच्या कामाचा समावेश राहील.

ii. पर्यटन स्थळापर्यंत पोहचण्यासाठी दळणवळण, सायनेजस, निवास व्यवस्था, होमस्टे, सोई सूविधा, सोलर लाईट व आनुषंगीक कामे.

iii. वनक्षेत्रात भ्रमंतीसाठी निसर्ग पाऊलवाटा, वन्यजीव व पक्षी निरीक्षण मनोरे, नौकाविहार, वाहतुक व्यवस्था ई.

iv. निसर्ग शिक्षणासाठी आवश्यक निसर्ग निर्वचन केंद्र तयार करणे, दृकश्राव्य साधने उपलब्ध करुन देणे, प्रकाशने, निसर्ग पर्यटनाशी संबंधीत परिसंवाद, संम्मेलन, मेळावे, प्रदर्शनी व आनुषंगीक कामे.

v. स्थानिक लोकांचे उपजिवीकेच्या संधी / रोजगार वाढविणे साठी आवश्यक कामे जसे क्षमता बांधणी, साधन सामुग्री उपलब्ध करुन देणे, ग्रामीण हस्त कला, वनाधारीत उत्पादनाची विक्री ई.

**3) आराखडे मंजुरी करीता सादर करणे व चालु / नविन बाब प्रस्ताव सादर करणे.**

1. या क्षेत्रातील तज्ञाकडुनच आराखडा तयार करुन घ्यावा.
2. आराखडे स्वयंस्पष्ट असावेत त्यात निसर्ग पर्यटनाशी सुसंगत कामाचाच समावेश करावा. सोबत नकाशे जोडावे.
3. या कार्यालयाचे पत्र क्रं. Desk no.2 METDB /02/date.5/04/2017 व कक्ष क्रं. 2(यो.)/723/17-18 दि 28/01/2018 अन्वये जारी केलेल्या सूचना सुध्दा विचारात घेवून त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी.
4. या कार्यालयास प्राप्त होत असलेल्या प्रस्तावात इमारत व रस्ते दुरुस्ती सारख्या कामाचा समावेश मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे दिसून येते. अशी कामे मंजुर आराखड्यात समाविष्ट असली तरी ही कामे चालु / नविन बाब प्रस्तावात या पूढे समाविष्ट करु नये. निसर्ग पर्यटनाशी सुसंगत असलेल्या वरिल अ.क्र. 1 ( i ते v) मध्ये नमुद असलेल्या कार्यबाबीचाच त्यात समावेश असावा.
5. रोपवनाची कामे करतांना त्याची अंदाजपत्रके प्रचलित नमुना अंदाज पत्राकानूसार तयार करावी व प्रस्तावात रोप वनाचा कामाचा नमुना क्रमांक (Model No.) अवश्य नमुद करावा. रोप वनाकरिता म.न.रे.गा. अंतर्गत 9 रोपवन नमुने व कॅम्पा अंतर्गत 5 रोपवन नमुने दिलेले आहेत. तसेच अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांनी मार्च 2018 मध्ये आणखी 3 रोपवन नमुने मंजूर केलेले आहे. त्याचा रोपवन कामाकरिता वापर करावा.
6. प्रस्ताव महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन तज्ञ समिती / निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीने मंजुर केलेल्या आराखड्यानुसारच असावा व प्रपत्र ब मधील कार्यबाबीसमोर मंजूर आराखडयाचा पृष्ठ क्रं. व बाब क्रमांक अवश्य नमुद करावा. अतिरिक्त कार्यबाबीचा त्यात समावेश नसावा.
7. प्रस्तावासोबत विवरण पत्र **1 व 2 प्रपत्र अ, ब, क** व मासीक निधी प्रवाह असावे.
8. ज्या कार्यबाबीना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी आवश्यक आहे अशा कार्यबाबीची अंदाजपत्रके तयार करुन ती सक्षम अधिका-यांकडुन मंजूर करुन घ्यावी व त्याचे क्रमांक प्रपत्र -ब मध्ये अवश्य नमुद करावे. अन्यथा ती कामे वगळून प्रस्ताव पुढे पाठविण्यात येईल.
9. संबंधित निसर्ग पर्यटन स्थळाकरिता आता पर्यंत मंजुर झालेला वर्ष निहाय निधी, झालेला बाबवार खर्च व उपयोगीता प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तावा सोबत जोडाव्या.
10. स्थापत्यकामाचे **रु. 25.00 लक्षचे वरील अंदाजपत्रक** असल्यास प्रशासकिय मान्यतेसाठी वन अभियंता यांचेकडे शासनास सादर करण्याकरिता पाठवावे. प्रशासकीय मंजुरी प्राप्त करुन घेण्याकरीता पाठपुरावा करावा व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्यावरच नविन / चालू बाब प्रस्ताव सादर करावा. एकाच मोठया बांधकामाचे / रस्ते दुरूस्ती कामाचे तुकडे करून अंदाज पत्रके तयार करू नये व त्यास तांत्रिक / प्रशासकीय मंजूरी देवून त्याचा प्रस्तावात समावेश करू नये. तसेच वन क्षेत्रातील बांधकामे, रस्ते इत्यादी वन संवर्धन कायदाच्या भंग करणारी कामे प्रस्तावीत करू नये.
11. प्रत्येक प्रकल्पाचा (नि.प.स्थळाचा) सन 18-19 करिता एकच प्रस्ताव सादर करावा.
12. निधी वितरीत करण्यासाठी सादर करावयाच्या प्रस्तावाचे प्रपत्र Form - 'A' मध्ये अवश्य देण्यात यावे व प्रस्तावासोबत जोडावे.
13. **मंडळाकडून मान्यताप्राप्त आराखडयांमध्ये वरील नमुद सूचनांनूसार सुधारणा करून सुधारीत आराखडे मान्यतेस्तव सादर करावे.**

वरील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पणे पालन करुन अचूक व मंजुर आराखड्यानुसार चालु / नविन बाब प्रस्ताव सादर करावे, जेणे करुन आपणाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मंजुरी करिता शासनास शिफारशीसह सादर करता येईल.

28/8/1

**(सूनील लिमये)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, म.रा. नागपूर**

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास) म.रा. नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

E:\DESK-2\Plan-2\18-19 Grant Distribute\Pariptrak 18-19.docx